ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# दलित रंगभूमी एक सामाजिक गरज



प्रा.डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर, जि. पुणे.

## प्रस्तावना :

सर्व धर्मातील पुनरुज्जवीनवाद्यांचा, सनातनी विचारांना विरोध असतो. धार्मिक पुनरुज्जीवनवाद हा धर्मनिरपेक्ष लोकशाहीला मारक आहे. समाज परिवर्तनाच्या चळवळीत भाग घेणाऱ्यांनी वैचारिक संघर्षास कायम तयार राहिले पाहिजे. विचारांचा मुकाबला विचाराने करता येत नाही तेव्हा तेव्हा सनातनवादी हिंसेचा मार्ग स्वीकारताना दिसून येतात.

युरोपमध्ये संस्कृतीच्या पुनरुज्जीवनातून विकसीत झालेली प्रबोधनाची चळवळ हळूहळू सर्व युरोपभर पसरली. जीवनाच्या सर्वक्षेत्रामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले.प्रबोधन ही एक परिवर्तनाची प्रक्रिया होती या प्रक्रियेमुळे युरोपियन समाजाची वाटचाल पारंपारिक व्यवस्थेकडून अधुनिक युगाकडे झाली. ही परिवर्तनाची प्रक्रिया प्राचीन संस्कृतीचे पुनरुज्जीवन करताना परंपरेचा आशय, परंपरेची संगती ही बदलता काळ आणि परिस्थितीच्या अनुरोधाने लावली गेली. थोडक्यात भूतकाळात जे घडून गेले, वर्तमानात जे घडत आहे आणि भविष्याकाळात जे घडवायचे आहे याचा वेध प्रबोधनाच्या चळवळींनी घेतला.

## प्रबोधन म्हणजे काय?

प्रबोधन म्हणजे केवळ भूतकाळात रमणे वा भूतकाळाला घट्ट पकडून बसणे नाही. तसेच ते परंपरा पूर्णत: नाकारुन केली जाणारी क्रांतीही नाही. पुनरुज्जीवनाची दृष्टी मुख्यत: भूतकाळाकडे वळलेली असते. क्रांतीची दृष्टी मुख्यत: भविष्याकडे. प्रबोधनात परंपरेचा गोठलेला प्रवाह गतीमान करायचा असतो. परंपरेला काळाबरोबर न्यायचे असते.युरोपियनांचे भारतामध्ये आगमन झाल्यानंतर पाश्चात्य संस्कृती आणि शिक्षण प्रक्रियेतून भारतीयांचा युरोपातील प्रबोधन कालीन घडामोडीशी परिचय झाला आणि भारतातही प्रबोधनाची चळवळ घडवून आणवी हा विचार भारतीय विचारवतांच्या मनात सुरु झाला. भारतातील प्रबोधनाची उद्दिष्टे मुख्यत: भारतीय संस्कृतीला तिची प्रतिष्ठा पुन्हा एकदा प्राप्त करुन देणे, परंपरेच्या रुढीच्या चौकटीत बंदिस्त झाल्यामुळे साचेबंद झालेल्या समाजाला गतिमान करणे, जातिभेद, पंथभेद, धर्मभेद यामुळे असंघटीत झालेल्या समाजाला संघटित करणे त्याला एकात्मता प्राप्त करुन देणे आणि विज्ञान तंत्रज्ञानात्मक संशोधनाला चालना देऊन समाजाची घडी बुध्दीवाद, इहवाद, व्यक्तिवाद या तत्त्वांच्या आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय या मूल्यांच्या आधाराने बसविणे अशी होती. यातूनच राजाराम मोहन रॉय पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पर्यंत अनेक लोकोत्तर विचावंत होऊन गेले त्या सर्वांचा प्रभाव मराठी साहित्यावर पडला आहे.

भारतीय व्यवस्थेमध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक विचारवंत पुढे आले त्याचप्रमाणे अनेक विचारवंतानी वेगवेगळया प्रबोधनांच्या उपकरणांचा अवलंब करण्यास सुरवात केली.

प्रबोधनाच्या उपकरणातील साहित्य हा घटक फार महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे चळवळ ही सुध्दा स्थितीशील समाजाला गतिमान करण्यासठी उपयोगी पडते. तर प्रसामध्यमे सामूहिक शिक्षणाची जबाबदारी पार पाडतात. संस्था, संघटनांच्या माध्यमातूनही सामाजिक प्रबोधने सुरु झाली.

## प्रबोधनाच्या चळवळींचा साहित्यावर झालेला परिणाम :

मराठी साहित्याचा उगमच प्रबोधनाच्या चळवळीतून झालेला आहे. महानुभव आणि संताच्या वाङमयापासून आजच्या दलित साहित्यापर्यंतच्या वाङ्मयीन वाटचालीला प्रबोधनाच्या चळवळीचा भक्कम आधार आहे. मराठी लेखकांनी प्रबोधनाच्या चळवळीपासून प्रेरणा घेतली. प्रबोधनासाठी आपली लेखणी झिजवली आहे. मध्ययुगातील संतांची चळवळ, अधुनिक काळात समाज सुधारणेची चळवळ, स्वातंत्र्योत्तर काळातील विविध सामाजिक चळवळी याला महाराष्ट्राची पुरोगामी परंपराच कारणीभूत आहे. संतांनी अध्यात्मिक समतेची लढाई तीव्र केली. ब्राम्होसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज आणि आंबेडकर चळवहीने समाज सुधारणेच्या चळवळी व्यापक केल्या. स्वातंत्र्योत्तर काळातील दलित चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, आदिवासींची चळवळ, भटक्या विमुक्तांची चळवळ, इ. ने महाराष्ट्राचे सामाजिक जीवन समग्र बदलण्याचा प्रयत्न केला. सभा, संमेलने, शिबिरे, चळवळी, विविध नियतकालिके, प्रसार माध्यमे अशा विविध माध्यमातून प्रबोधनाचा विचार लोकांपुढे मांडण्यात आलेला आहे. सनातनी व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला. छळ व अपमान सहन करुन समतेसाठी, न्यायासाठी संघर्ष केला. त्यामुळेच समाज प्रगतीच्या दिशेने कूच करु शकला. विषम समाज व्यवस्थेकडून नव्या समाज रचनेकडे झालेला हा प्रवास समजून घेणेच आवश्यक आहे.

इंग्रजी राजसत्तेने भारताच्या इतिहासात नव्या क्रांतीपर्वाला आरंभ झाला होता. त्यापूर्वीचे समाज जीवन म्हणजे धर्माच्या चाकोरीमध्ये बंदिस्त असणारे जीवन होते. भारतीय समाजाची सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगे धर्माच्या नियंत्रणाखाली होती. धर्मांचे निर्बंध तोडणे हा अपराध समजला जात असल्यामुळे जुलूम जबरदस्ती होत असली तरी निमुटपणे सहन करणे हे आपले कर्तव्य आहे असे समजले जाई. धर्मविरोधी भूमिका घेणाऱ्या व्यक्तींना समाजात स्थान नसे. इंग्रजी सत्तेने ब्राम्हण वर्गाच्या व्यवस्थेलाच सुरुंग लावला आणि समतेवर आधारित नवा समाज रुढ करण्यासाठी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची बींज रोवली. यातूनच महाराष्ट्रातील समाज सुधारकांची नवी पिढी उदयास आली. महाराष्ट्रात सामाजिक गुलामगिरीच्या विरोधात पहिले बंड महात्मा फुले यांनी पुकारले. २४ सप्टेंबर १८७३ साली स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्य कल्पनांना मानणारी विचार प्रणाली सत्यशोधक समाज या रुपाने स्थापन झाली. परमेश्वराच्या दृष्टीने सर्व समान, त्या परमेश्वराची उपासना करण्यासाठी भटजींची आवश्यकता नाही, मनुष्य जन्माने श्रेष्ठ ठरत नसून गुणाने श्रेष्ठ ठरतो. सत्यशोधक समाजने हे तत्व लोक मनात रुजविण्यासाठी अभंग, सभा, संमेलने तसेच लोकांमध्ये बहुश्रुत असलेल्या तमाशाचा वापर केला. या तमाशालाच त्यांनी 'सत्यशोधकी तमाशा' असे नाव दिले. या तमाशाचे सुधारित रुप म्हणून सत्यशोधकी जलसांची निर्मिती झाली.

जलसा हा कला प्रकार सत्यशोधक समाजाने रंजनातून लोक जागृती करण्यासाठी निर्माण केला. रंजनातून लोकजागृती करण्यासाठी लोकजीवनाशी जवळीकता निर्माण करणारे लोकगीत अशी ही व्याख्या करता येईल. याच जलशातून समाज परिवर्तनासाठी आवश्यक असे विषय लोकांपुढे मांडले. 'शिक्षणाला वंचित झालेल्या लोकांना शिक्षणाभिमुख करुन त्यांना भानावर आणून मानसिक गुलामगिरीची बेडी तोडून टाकण्यास उद्‌युक्त करतो तो जलसा' अशी ही ढोबळ मानाने आपणास व्याख्या करता येईल. व्याख्यानाला जेथे दहा लोक जमा होत नाहीत तेथे हलगीवर थाप मारली की भराभर लोक जमा होतात. डफ, ढोलकी, तंबोरा या तमाशातील वादयांना सत्यशोधक जलशांनी आकर्षून घेतले.सत्यशोधकी जलसांचा हेतू केवळ घटकाभर मनोरंजन नव्हते तर व्यापक सामाजिक प्रबोधन हे त्यांचे साध्य होते. जलशांच्या रुपाने लोकांना जवळ बोलवावयाचे व त्यांना त्यांची स्थिती पटवून द्यायची, हया हेतूने समाज बंधूनी पोवाडे, लावणी, पदये, रचली. शेतकऱ्यांचे दारिद्रय मद्यपानाचे दुष्परिणाम, जातिभेद इ. समाजोद्‌धारक गोष्टी नाटयांच्या माध्यमातून जलशोब्दारात पटवून देण्यात येत असत.

## आंबेडकरी जलसे :

एकेकाळी भारतीय परंपरेने शूद्र जातींना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अधिकार नाकारल्याचे निदर्शनास येते. याचा अर्थ असा की शूद्राच्या संपूर्ण जीवनावर इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने पूर्णत: निर्बंध ठेवलेले होते. मात्र शिल्पी जीवन जगण्याचे स्वातंत्र्य शुद्रांना बहाल करण्यात आलेले होते. त्यामुळे शिल्पकला, रंगकला, नाटय, नृत्य आणि संगीत कलांचे जनकत्व दलित समाजाकडे जाते. हे प्राचीन परंपरेचा अभ्यास करता नाकारता येत नाही. भरताच्या नाटयशास्त्राची निम्रिती सुध्दा दानव, राक्षस, शुद्र यांच्यासाठी झालेली हाती. मराठी रंगभूमी अस्तित्वात येण्याच्या अगोदर मराठी माणसांची अपेक्षापूर्ती तमाशाने केली. डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या लोक ‘साहित्याचे स्वरुप’ या ग्रंथात तमाशाला विधीनाटय म्हटलेले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून पुढे ‘आंबेडकरी जलसे उदयास आले’. नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहापासून महाराष्ट्रात विपूल असे जलसे लोकजागराचे कार्य करीत होते. त्यात भीमराव दादा कर्डक यांच्या जलशांचा निद्रेश करावा लागेल. या जलशांनी दलित नाटक किंवा रंगभूमीची पायाभरणी केली आणि तया पायावर दलित रंगभूमी उभी राहिली. आंबेडकरी जलसा हे मराठी तमाशांचे हे सुधारीत रुप होते. तमाशांना आलेले पारंपारिक रुप बदलून जलशांनी त्याला समाज प्रबोधनाचे नवे परिमाण प्राप्त करुन दिले.

आंबेडकरी चळवळीचा आशय खेडयापाडयात, लहानथोरांपर्यंत पोहचविण्यासाठी आंबेडकरी जलसे उभे केले. समाजाबद्दल आस्था आणि प्रतिभा संपन्न कलावंत हे जलशांतील कलाकार होते. आंबेडकरी चळवळींचा आशय एखाद्या लोकप्रिय आणि लोकपरिचीत माध्यमातून पसरविणे ही त्या काळाची गरज होती. अत्यंत हालाखीची अस्पृश्य समाजाची अवस्था सामाजिक उपेक्षा व दारिद्रय यांच्यात ती भरडली जात होती. अशिक्षित समाज व अडाणी असल्यामुळे पूर्व परंपरेनुसार चालत आलेल्या रुढींचा पगडा त्यांच्या मनावर बसलेला असल्यामुळे आपण शुद्र—अतिशुद्र आहोत, आपलयापेक्षा श्रेष्ठ अशा ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य यांची सेवा करणे व आपल्या पायरीने राहणे हीच या जन्मीची इतिकर्तव्यता आहे अशी भोळी भाबडी समजूत होती. ही चूकीची समजूत आहे हे पटवून देणे व माणूसकीची जाणीव करुन देणे या विचारातून आंबेडकरी जलशंची निर्मिती झाली.

‘जलसा म्हणजे अस्पृश्यांच्या माणुसकी हक्कांचा सादयंत इतिहास’ असे भीमरावदादा कर्डकांनी म्हटले आहे. साक्षर वा निरक्षर या सर्वांनाच जलशांचा उपयोग झाला. जलसा हे त्या काळातले आंबेडकरी विचार मांडण्याचे एक प्रमुख हत्यार बनले. नाशिक, कोल्हापूर, मुंबई येथील अनेक तरुण पुढे आले. दादासाहेब पगारे म्हणतात, ‘‘जनता ही नादलुब्ध आहे.’’ त्यातूनच कोल्हापूर कोल्हापूर सरकारप्रमाणे जलसा करावा असे ठरले. त्यातूनच ‘महारकीचा फार्स’ हा अनिष्ट रुढीविरुध्द सुरु झाला. काही जलसाकारांनी अस्पृशांची दु:खे निवारण करण्यावर अधिक भर दिला. यातूनच दलित रंगभूमीचा पाया रचला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून सत्यशोधक जलशांचे व आंबेडकरी जलशांचे कार्य महत्वाचे आहे. हजारो वर्षाच्या दास्यातून मुक्त करणाऱ्या महान व्यक्तींच्या चरणी नमन करुन जलशांची सुरवात होऊ लागली. ज्या महामानवाच्या कर्तृत्वामुळे भारतातील धर्मधिष्ठित समाज व्यवस्थेला नवीन जीवनमूल्यांची ओळख झाली त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव जलशांनी सुरु केला.

हजारो वर्षे मूकपणे अन्याय सहन करणाऱ्या अस्पृश्यांना सत्यशोधकी जलशातून व आंबेडकरी जलशातून या पध्दतीने बोलते केल्यामुळे लोकमनावर विलक्षण परिणम झाला. याची दखल प्रबोधनकार ठाकरे यांनी माझी जीवन यात्रा मध्येही घेतली. स्वत: बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा जलशांची दखल घेताना म्हटले की, ‘‘माझ्या दहा सभा—मिटींगा आणि भीमराव कर्डकांचा एक ालसा बरोबर आहे.’’या बाबत डॉ. गंगाधर पानतवणे म्हणतात की, ‘‘आंबेडकरी काळात पायाला चाक बांधून भटकंती करणाऱ्या कित्येक दलित शाहिरांच्या, जलसाकारांच्या, लोककवींच्या खांद्यावर आजचे दलित साहित्य उभे आहे.’’ महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये या जलसाकारांचे महत्वाचे योगदान आहे. समाज परिवर्तनाची चळवह पुढे नेणाऱ्या या कलावंतांची दखल घेतली गेली नाही. तरी किसन फागु बनसोडे, केरु बुवा गायकवाड, अर्जुन हरि भालेराव, प्रभाकर गवई इत्यादींची नावे घेता येतील.

## दलितांचे राजकीय भवितव्य

दिनांक २५—२६ फेब्रुवसाी २००४ रोजी पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चर्चासत्रात प्रा. दत्ता भगत म्हणाले, ''महाराघरी गाणे आणि बामणाघरी लिव्हणे ही म्हण अनेक जण फार अभिमानाने उच्चारताना मी ऐकले. पण गाणे या जलशा पध्दतीने गाणे या पलीकडे तरी दलितांना अर्थ अभिप्रेत असेल असे वाटतनाही.''दलित रंगभूमीची चळवळ पूर्णपणे मंदावलेली दिसत आहे. १९९० पर्यंत जे काय व्हायचे ते सर्व घडून गेले. डॉ. आंबेडकरांनी आपल्याला 'शिका' असे म्हटले. या शब्दाचा अर्थ केवळ क्रमिक शिक्षण हया एवढा मर्यादित नव्हता.  समाजातले अंत:प्रवाह जाणू घ्या, मुत्सुद्देगिरीच्या राजकारणातले अंत:सूत्र समजून घ्या आणि शोषणमुक्त समाज रचनेच्या अंगाने वाटचाल करा असा व्यापक अर्थ 'शिका' या शब्दाचा होता. दलित रंगभूमीने आपली मरगळ झटकून पुन्हा नव्या जोमाने बाबासाहेबांचे विचार मांडण्याची गरज आज पुन्हा निर्माण झाली आहे असे वाटते.

आंबेडकरी जलशांचे मातृस्थान हे सत्यशोधकी जलसे होते. ज्या काळात दलितांची खास अशी वृत्तपत्रे नव्हती.  प्रस्थापित वर्तमानपत्रे बाबासाहेबांना त्यांच्या चळवळींना प्रसिध्दी देत नव्हती किंवा विकृत स्वरुपात देत हेती. या सर्व पार्श्वभूमीवर जलशांचे कार्य उठून दिसते.

धार्मिक व समाजिक क्रांतीची प्रेरणा घेतलेली बहुजन समाजातील चळवळ म्हणजे ब्राम्हणेतर चळवळ ही प्रेरणा डॉ. आंबेडकरांनी डोळयासमोर ठेवून ज्या चळवळी केल्या त्यातून दलित साहित्य जन्माला आले.  स्वाभिमान व स्वावलंबन, माणूसकीचा आग्रह, लाचार होऊन न जगणे, भारतीय म्हणून सर्व क्षेत्रात अधिकर मिळावेत याचा आग्रह, स्वत:चा मार्ग स्वत: चोखाळणे, हिंदू सोबत सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक समतेसाठी लढा देणे या बाबी आंबेडकरांच्या चळवळीची वैशिष्टये होती. आंबेडकरी जलशामधून हे सर्व आपणांस दिसून येते. भीमराव कर्डकांनी तरी आपल्या जलशा मधून आंबेडकरांचे तत्वच मांडलेले दिसते.

## दलित रंगभूमी :

दलित नाटय चळवळीचा खरा प्रारंभ औरंगाबादचा मिलिंद महाविद्यालयाच्या परिसरातून झाला. डॉ. भालचंद्र फडके यांनी दलित रंगभूमी या संपादीत ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत हेच मत मांडले आहे. कारण मिलिंद महाविद्यालयाचा परिसर डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक लढयाचे वैशिष्टय असे की, नागपूरच्या धर्मांतर समारंभानंतर ६ लाख लोकांनी त्या नाटकाचा प्रयोग पाहिला मराठी रंगभूमीवर एवढया जनसमुदायापुढे झालेले हे पहिलेच नाटक असावे. 'युगयात्रा' एवढया विशाल जनसमुदायापुढे झालेले एकमेव नाटक होते.  दलित कलावंताच्या नाटयमंडळरू महाराष्ट्रात नावाजलेल्या होत्या.  परंतु ज्याला दलितनाटक किंवा रंगभूमी आपण म्हणतो त्याच्याशी यांचा काहीही संबंध जोडता येणार नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दबलेले, दडपलेले स्तर जागे होत आहेत.  नव्यानेच जाग्या होणाऱ्या स्तरातून दलित लेखक पुढे येत आहेत.  त्यांना आपल्या समाजाची दु:खे प्रभावीपणे वेशीवर टांगायची असतील तर त्यांनी 'रंगभूमी' या सामर्थ्यवान माध्यमाचा वापर केलाच पाहिजे.  दलित स्तरावरील लेखकाचा विद्रोह, त्याची वेदना त्याचा नकार प्रभावी रीतीने व्यक्त होऊ शकेल तो रंगभूमी या माध्यमातूनच.  म्हणून रंगभूमीचे आव्हान स्वीकारुन दलित नाटक रंगभूमी करणे गरजेचे आहे.

३०—३१ जानेवारी १९९९ रोजी सोलापूर येथे भरलेल्या अखिल भारतीय प्रबुद्ध नाटय संमेलनातील अध्यक्षीय भाषणत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी म्हटले की, 'हिंदुच्या समाज व्यवस्थेत अस्पृश्य जाती गुलामच होत्या.  हा अस्पृश्य दृश्य असूनही अदृश्य होता.  तो मानव्याचे ओझे वाहणारा दु:खग्रस्त माणूस होता.  अस्पृश्य माणसाचे मोडलेपण, नाकारलेपण आणि दु:खग्रस्तता हिंदू समाज व्यवस्थेने मान्य केली होती.  त्यावर शिक्का मोर्तब केले होते.  अमेरिकेतील काळयांच्या गुलामगिरीपेक्षाही भारतातील अस्पृश्यता भीषण होती आणि आहे.  ज्यांनी अन्याय हाच न्याय मानला आणि पीडित व शोषितांचे, अस्पृश्यांचे मानसिक व शारिरिक छह केले तेथे न्यायविषयक कल्पना, नष्ट होणार नाही तर काय? मग तेथे अस्मिता कशी जागी होणार? असे स्वत्व तरी कसे फुलोरुन येणार? अंधारात चाचपडणाऱ्यांना प्रकाशझोताकडे नेणारा एखादा युगंधर हवा असतो.  असा युगंधर डॉ. आंबेडकरांच्या

नावाने भेटला आणि आम्हांला नवी जीवन दृष्टी लाभली. जीवनाला नवीन आशय गवसला, स्वाभिमानाची तुतारी फुंकली गेली. परंतु काही दिवसात या दलित रंगभूमीची अवस्था बिकट झाली. झाला तेवढा व्यायाम पुरे झाला. तो आयुष्यभर पुरेल, प्रकृती उत्तम राहील हा आशावाद फोल ठरला. आज क्षीण झालेल्या दलित रंगभूमीने, दलित लेखकांनी आपली अस्मिता जागी करण्याची गरज आहे प्रबोधनात्मक वैचारिक अंगाने आजही अनेक प्रश्न रंगभूमीच्या आधाराने मांडता येतील.'' डॉ. गंगाधार पातनातवण्यांचे भाषण म्हणूनही महत्वाचे वाटते.

पाश्चात्य देशात विशेषत: अमेरिका किंवा अफ्रिका येथील निग्रोंना जे सहन करावे लागले त्यातून 'ब्लॅक थिएटर' 'ब्लॅक पॅंथर'ची चळवळ उभी राहिली. काळयागोऱ्यांचा संघर्ष हाच ब्लॅक नाटककारांचा प्रिय विषय होता. त्याला रंगभूमी या चालत्या बोलत्या माध्यमाने साथ दिली. त्यातूनच निग्रोंच्या मनात सर्वकष क्रांतीची बीजे पेरली गेली. त्यांची अस्मिता जागी झाली. याचाही विचार दलित रंगभूमीने करायला पाहिजे. तमाशा, भारुडे, बहुरुपी इ. लोकनाटयाची रुपे व त्यांचे सामर्थ्य वापरुन दलित रंगभूमीला जनजागृतीचे आंदोलनही करता येईल.

## दलित रंगभूमी :

आज दलित रंगभूमी समोर अनेक आव्हाने आहेत. प्रस्थापितांच्या गर्दीत एक होऊन जाण्यापेक्षा स्वत:ची शैली निर्माण करण्याची गरज आहे. नाटयगृहे परवडत नाहीत, कुशल कामगार तसेच नटही नाहीत. दलितांना हे सर्व शून्यातून उभे करावे लागेल. केवळ मनोरंजनातून, लोकजागृती किंवा प्रबोधन करणे ही एकच गोष्ट मनावर घेतल्यास यातील कोणतीही गोष्ट अशक्य नाही. दलितांच्या वस्तीत, रस्त्यांच्या चौकात, गावकुसाशेजारी, देवळासमोर, जिथे जागा मिळेल तिथे आपली कला प्रबोधनासाठी सादर करावी लागेल. कारण दलित रंगभूमी ही एक सामाजिक गरज आहे.दलित समाजाच्या मनाची मशागत प्रथम करायची असेल तर दलित रंगभूमीचा वापर करणे ही काळाची गरज आहे. जया वाल्मिकीच्या अंत:करणात जो 'क्षोभ' निर्माण होतो त्यातून महाकाव्य जन्माला येते. तसे दलित रंगभूमीवर दलितांच्या अंतरात उसळलेला क्षोम काव्यत्व पावावा आणि ते काव्य समाजपरिवर्तनाच्या चक्राला प्रचंड गती देणारे असावे. आज आमची ऊर्जा केंद्रे नष्ट करण्याची षडयंत्रे रचली जात आहेत. सरकारी उद्योगाचे खाजगीकरण करुन नोकरी पासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न सुरु आहेत.वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण महाग होत आहे. घटना बदलण्याचे प्रयत्न सुध्दा सरु आहेत. आरक्षणावरही अतिक्रमणे सुरु झालेली आहेत. हे सर्व थोपवावाचे असेल तर सर्वकष अशा क्रांतीचे बीज रोवली पाहिजेत आणि ते काम दलित रंगभूमी आजही समर्थपणे करु शकेल असा मला विश्वास वाटतो.

## समारोप :

मिलिंद महाविद्यालयाचा परिसर दलित साहित्याचे उगम केंद्र झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली चळवळीची दिशा निश्चित करुन बहुजनांच्या व दलितांच्या उन्नतीसाठी विकासासाठी काम सुरु केले. दलित रंगभूमी का आणि कशासाठी हे आजही डॉ. आंबेडकरांच्या भाषेत सांगता येईल. महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रह परिषदेसमोर आपल्या भाषणात ते म्हणाले, ''साप करावयाचा झाला तर तयाचे मूह कशात आहे हे शोधून काढून त्या मुळावर घाव घातला पाहिजे. कोणाचे मरण कशात आहे हे ओळखूनच त्यावर मारा करावयाचा असतो.''बाबासाहेब पुढेही म्हणतात की, ''भीमाने दुर्योधनाच्या मांडीवर गदा घातली म्हणन दुर्योधन मेला. ती त्याच्या डोक्यावर घातली असती तर तो मेला नसता. कारण दुर्योधनाचे मरण त्याच्या मांडीत होते, डोक्यात नव्हते. आजच्या काळात दलितांच्यामध्ये जे गट तट निर्माण झाले आहेत त्यांचे मूळ कशात आहे साहित्यिकांनी शोधून लोक जागतीचे काम केले पाहिजे. कारण साहित्याचा व समाजाचा परस्पर संबंध आहे. दूरदर्शनच्या वेगवेगळया असंख्य वाहिन्यांमुळे वाचकांचे वाचनाचे प्रमाण कमी झालेले आहे. महात्मा फुले, राजर्षी शहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेउकरांचे विचार केवळ ग्रंथालयातील पुस्तकात बंदिस्त झालेले आहेत. तेच विचार दलित रंगभूमीवर दृश्य व श्राव्य रुपाने मांडण्याची गरज आहे. कारण लोकरंजनातून लोकजागृती महत्वपूर्ण वाटते. दलित रंगभूमी क्षीण

झाली असे म्हणणारे प्रा. दत्ता भगत सुद्धा या रंगभूमीसाठी काहीतरी पुन्हा लिहिले पाहिजे असे म्हणतात. कारण प्रेक्षकांशी साक्षात संवाद साधू शकेल व प्रबोधन होऊ शकेल असे माध्यम म्हणजे रंगभूमीच होय.

**संदर्भसूची :**

१) दलित रंगभूमी : काल आणि आज, डॉ. कृष्णा किरवले, मॅजिक प्रकाशन, पुणे.
२)दलितांची कविता : प्रेरणा आणि स्वरुप, डॉ. भालचंद्र फडके.
३)प्रबोधनपर साहित्य : स्वरुप व संकल्पना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
४)मनुवाद्यांना घटना का बदलाविशी वाटते? प्रा. दिनेश मोरे
५)साहित्य, शोध आणि संवाद, संपादक डॉ. मनोहर जाधव
६)सांस्कृतिक राजकारण आणि दलित, प्रा. दत्ता भगत
७)अक्षरगाथा, वर्ष सहावे, अंक चौथा, १० जानेवारी २०१६